# महाराष्ट्र शासन
## महिला व बाल विकास आयुक्तालय

२८, राणीचा बाग, जुन्या सर्कीट हाऊसशेजारी, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

जाहिरात क्र.मबाविआपु/मवि/मिश/नवीन/शस/२०२५-२६/०१

दिनांक २३.०३.२०२६

## जाहिरात

केंद्र शासनाच्या "मिशन शक्ती" या एकछत्री योजनेअंतर्गत "शक्ती सदन" या योजनेअंतर्गत शक्तीसदन केंद्रे चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्याबाबत भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालय यांच्या मिशन शक्ती या प्रमुख योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये महिलांसाठी "शक्ती सदन" (Women Shelter cum Support Centre) केंद्रे नवीन स्वरूपात सुरु करण्यास मान्यता देण्यात येणार आहे.

या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्यातील संबंधित जिल्ह्यांमध्ये महिलांच्या कल्याण, संरक्षण, पुनर्वसन व सामाजिक पुनर्वसन क्षेत्रात कार्यरत असलेल्या पात्र स्वयंसेवी संस्था / नॉन गव्हर्नमेंट ऑर्गनायझेशन (NGO) यांच्याकडून खालील जिल्ह्यांसाठी समोर नमूद शक्तीसदन केंद्रांकरीता ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | जिल्हा | शक्तीसदन संख्या | अ.क्र. | जिल्हा | शक्तीसदन संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई शहर | १ | १३. | जळगाव | २ |
| २. | ठाणे | २ | १४. | नंदुरबार | १ |
| ३. | रायगड | १ | १५. | अहिल्यानगर | १ |
| ४. | पुणे | १ | १६. | धुळे | १ |
| ५. | सातारा | १ | १७. | छत्रपती संभाजीनगर | १ |
| ६. | कोल्हापुर | १ | १८. | नांदेड | २ |
| ७. | बुलढाणा | १ | १९. | हिंगोली | १ |
| ८. | अमरावती | २ | २०. | जालना | १ |
| ९. | यवतमाळ | २ | २१. | परभणी | १ |
| १०. | वर्धा | १ | २२. | बीड | १ |
| ११. | गोंदिया | १ | २३. | पालघर | १ |
| १२. | नाशिक | २ | | एकूण | २९ |

त्यानुसार, केंद्र पुरस्कृत शक्तीसदन योजनेबाबत महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि. २९ मार्च, २०२३ व दि. ०७ मार्च, २०२४ मध्ये नमूद करण्यात आलेल्या पात्रता, मार्गदर्शक सुचना, अटी व शर्तींची निकष पुर्तता करणाऱ्या इच्छुक स्वयंसेवी संस्थांनी जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांत https://wcdiwatch.in/shaktisadan/ या संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन प्रस्ताव सादर करावा. प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक ०६.०४.२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत राहील. शक्तीसदन योजनेअंतर्गत स्वयंसेवी संस्था निवडीसंदर्भात मार्गदर्शक सुचना, अटी व शर्ती, तसेच इतर माहिती www.maharashtra.gov.in तसेच, https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. विहित मुदतीनंतर सादर करण्यात आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही, तसेच कोणत्याही कारणास्तव अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात येणार नाही, सदर जाहिरात प्रक्रीयेत जागांबाबत तसेच इतर बाबींसंदर्भात बदल करण्याचे अंतीम अधिकार राज्य शासनास राहतील. कृपया याची नोंद घ्यावी.

(नयना अर्जुन गुंडे) भा.प्र.से.
आयुक्त,
महिला व बाल विकास,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

**<u>इतर आवश्यक सुचना व माहिती:-</u>**

(१) स्वयंसेवी संस्थांनी जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांत ऑनलाईन अर्ज सादर करावा.

(२) सर्व संस्थांनी फक्त ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावयाचा आहे. ऑफलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

(३) प्रस्तावांची छाननी शासन निर्णय व मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येईल.

(४) अपूर्ण/विहिती कालमर्यादेनंतर सादर केलेले अर्ज/प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

(५) एका जिल्ह्यामध्ये एकापेक्षा अधिक स्वयंसेवी संस्थांचे परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यास अनैतिक व्यापार प्रतिबंध अंतर्गत काम करणाऱ्या, अधिक कामाचा अनुभव असणाऱ्या व महिला व बाल विकास विभागाअंतर्गत निवासी संस्था चालविणाऱ्या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

(६) प्रस्ताव मंजूर/नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार राज्य शासनाकडे राखून ठेवण्यात आला आहे.

(७) सदर जाहिरात प्रक्रीयेसंदर्भात शक्तीसदन योजनेचे सविस्तर निकष, अटी व शर्ती संकेतस्थळावर उपलब्ध असून अद्ययावत माहितीसाठी वेळोवेळी संकेत स्थळास भेट देण्यात यावी.

(८) एका संस्थेस केवळ एका जिल्ह्यामध्येच अर्ज सादर करता येईल. एकापेक्षा जास्त अर्ज सादर केल्यास संस्थेचा शक्तीसदन योजनेअंतर्गतचा एकही अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

(९) संस्थेचे सर्व कागदपत्रे, अनुभव व क्षमता व कार्ये याबाबत महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे येथे सादरीकरण करणे आवश्यक राहिल सादरीकरणाच्या आधारे आयुक्तालयामार्फत शिफारस करण्यात येईल.

***************

८

**<u>शक्तीसदन योजनेअंतर्गत "शक्तीसदन केंद्र" चालविण्याकरीता स्वयंसेवी संस्थांनी खालील नमूद अटी व शर्तींचे पालन करणे आवश्यक आहे.</u>**

१. स्वयंसेवी संस्थांनी शक्तीसदन योजनेबाबत महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दि. २९ मार्च, २०२३ व दि. ०७ मार्च, २०२४ मधील सर्व निकष, अटी व शर्तींची पुर्तता करणे बंधनकारक आहे.

२. संस्था सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अथवा संबंधित कायद्यानुसार नोंदणीकृत असावी.

३. संस्थेची आर्थिक स्थिती सक्षम असावी व मागील ३ वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल उपलब्ध असावेत.

४. संस्थेकडे शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक इमारत, पायाभूत सुविधा व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची क्षमता असावी.

५. संस्थेने केंद्र/राज्य शासनाच्या कोणत्याही योजनेत गंभीर अनियमितता केलेली नसावी.

६. योजनेअंतर्गत स्वयंसेवी संस्थांना नव्या बांधकामासाठी कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही.

७. स्वयंसेवी संस्थांना प्रशासकीय तसेच व्यवस्थापन खर्च आणि इमारत भाडे इ. करीता अनुदान शासन निर्णय दि. २९ मार्च, २०२३ व दि. ०७ मार्च, २०२४ मधील तरतुदींनुसार अदा केले जाईल.

८. प्रत्येक शक्तीसदन केंद्राची कमाल प्रवेशित क्षमता ५० इतकी अनिवार्य राहील.

९. ५० प्रवेशितांची क्षमतेनुसार सर्व सोई-सुविधा असाव्यात.

१०. संबंधित संस्थेस अनैतिक व्यापारास प्रतिबंध करणे या विषयांमध्ये कार्य करण्याचा किंवा महिला कल्याण व सामाजिक क्षेत्रामध्ये काम करण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.

११. संस्थेचा वार्षिक ताळेबंद किमान रू.२० लक्ष ( मागील लगतच्या ३ वर्षांचा सरासरी २० लक्ष ) इतका असावा तसेच किमान रू.१५ लक्ष इतकी मुदत ठेव गुंतवणूक असणे आवश्यक आहे

१२. स्वयंसेवी संस्था नीती आयोगाच्या दर्पण या पोर्टलवर नोंदणीकृत असावी.

१३. संस्थेच्या स्वतःच्या मालकीची किंवा कमीत कमी ३ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टीवर घेतलेली जागा असावी

१४. मनुष्यबळ व इमारत भाडे या संदर्भात प्रत्यक्ष मान्यता प्राप्त होऊन संस्था कार्यान्वित झाल्यानंतरच अनुदान देय राहील .

१५. एका जिल्ह्यामध्ये एकापेक्षा अधिक स्वयंसेवी संस्थांचे परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यास अनैतिक व्यापार प्रतिबंध अंतर्गत काम करणाऱ्या, अधिक कामाचा अनुभव असणाऱ्या व महिला व बाल विकास विभागाअंतर्गत निवासी संस्था चालविणाऱ्या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

१६. सदर शक्तीसदन केंद्र हे केंद्र शासनाच्या मिशन शक्ती या एकछत्री योजनेअंतर्गत मंजूर करण्यात येत असून शक्तीसदन केंद्र ज्या स्वयंसेवी संस्थेमार्फत संचलित करण्यात येईल, त्या संस्थेस केंद्र शासनाने त्यांच्या हिश्याचा निधी वितरीत केल्यावरच राज्य शासनाचा समप्रमाणातील हिस्सा वितरीत करण्यात येईल.

१७. केंद्र हिश्यातील निधी विहीत कालावधीत वितरीत न झाल्यास राज्य हिश्यातुन निधी उपलब्ध करून देण्याकरीता सदर संस्थेस मा. न्यायालयात दावे दाखल करता येणार नाही.

****************